!! श्री !!

**खासदार चंद्रकांत खैरे**

**शिवसेना उपनेते**

जा.क्र. : खा.का.प्र.प ४३१ २८-१-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शिवसेनाप्रमुखांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित करमाडच्या मोफत नेत्रचिकित्सा शिबीरात अडीच हजार रुग्णांची नेत्रतपासणी

**करमाड ( ता. २८ ) :** हिंदुहदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त करमाड येथील शितल लॉन येथे पार पडलेल्या मोफत नेत्र तपासणी व चिकित्सा शिबीरात अडीच हजार रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली. शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्याहस्ते यांच्याहस्ते शिबीराचे उद्घाटन करण्यात येणार आले. यावेळी संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, तालुकाप्रमुख अशोक शिंदे बप्पा दळवी, विजय वाघचौरे, विजय सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबीरात २२४० रुग्णांची डोळे तपासणी, १६५० रुग्णांना चष्मा वितरण ५९० रुग्णांना औषधी व ३५० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत पार पडल्या. या शिबीराचे आयोजन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्यावतीने करण्यात आले होते. मुंबई येथील अॅम्पेथी फाउंडेशन यांच्या सहकार्याने या शिबिराचे संयोजन शिवसेना संभाजीनगर च्या वतीने करण्यात आले होते. शिवसेनाप्रमुखांच्या शिकवणीनुसार ऐंशी टक्के समाजकारण करत शिवसेनाप्रमुखांच्या जन्मदिनानिमित्त शिवसैनिकांनी जनसेवेचे घेतलेले व्रत पूर्ण करते आहे यापुढेही शिवसेना जनसेवेत अविरत झटत राहील व समाजातील प्रत्येक घटकाच्या न्यायासाठी लढत राहील असे प्रतिपादन या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले. येत्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शिवसेना आपली ताकद दाखवुन देईल त्यासाठी प्रत्येक शिवसैनिकांनी कामाला लागावे असे आवाहनही त्यांनी उपस्थित शिवसैनिकांना केले. संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांनी असेच समाजउपयोगी उपक्रम शिवसेना यापुढेही भविष्यात घेतच राहील असे सांगितले.

यावेळी प्रशांत मस्के, नारायण कानकाटे, विठ्ठल मुळे, बाळासाहेब भोसले, भाऊसाहेब जाधव, अंबादास पाडळे, कृष्णा पवार, प्रल्हाद जाधव,साईनाथ घावटे, प्रमोद गोसावी, गोपाल सांळूके, कैलास धुळे, रामेश्वर डोईफोड, पांडूरंग पवार, प्रयागताई कोर्डे, अविनाश जाधव, डॉ. पांडूरंग चौधरी, जिजा कोरडे, उत्तम उकीर्डे, विनायक उकीर्डे, बाळासाहेब कोकाटे, बाबुराव महाराज उकीर्डे, दत्ता कोरडे, रामेश्वर तारो, भगवान भावले, मुंकूद भावले, बबलू तारो, विजय उकीर्डे, कृष्णा शेळके, नारायण मुळे, दत्ता शेळके, गणेश भावले, बबलू कोरडे, अरविंद कुबेर, शिवाजी तोगे दत्ता शिंदे, शिवाजी उकिर्डे यांच्यासह आजी-माजी शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**


कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525